अनुसूचित जमातीच्या जातीच्या प्रमाणपत्रांची तपासणी.

महाराष्ट्र शासन,
आदिवासी विकास विभाग,
शुध्दीपत्र क्र.एसटीसी-1099/प्र.क्र.33/का.10,
मंत्रालय विस्तार, मुंबई 400 032, दिनांक 16, एप्रिल, 1999.

वाचा :- (1) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्रमांक सीबीसी-1680/43669/का.5, दिनांक 29 ऑक्टोबर, 1980.
(2) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक सीबीसी-1684/2818/(291)/का.11, दिनांक 23 जानेवारी, 1985.
(3) शासन परिपत्रक, आदिवासी विकास विभाग, क्रमांक सीबीसी-1085/(420)/का.11, दिनांक 24 जानेवारी 1985.

शुध्दीपत्र :- ज्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रथम वर्षी अभियांत्रिकी व वैद्यकीय शाखेला प्रवेश घ्यावयाचा असतो त्या विद्यार्थ्यांनी त्यांचा जातीचा दावा अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडून पडताळून घेण्याची कार्यपध्दती शासन परिपत्रक, आदिवासी विकास विभाग, क्रमांक सीबीसी-1085/(420)/का.11, दिनांक 24 जानेवारी, 1985 अन्वये विहित केली आहे. या शासन परिपत्रकातील परिच्छेद क्रमांक 5 मध्ये पुढीलप्रमाणे नमूद केले आहे:-

"वैद्यकीय शिक्षण तथा औषधी द्रव्ये विभाग आणि शिक्षण तथा सेवायोजन विभाग (तांत्रिक शिक्षण) यांनी संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेशांच्या नियमात अशी सुधारणा करावी की, ज्यायोगे मेडिकल व इंजिनियरींग महाविद्यालयांमध्ये अनुसूचित जमातींसाठी राखीव असलेल्या जागांसाठी अर्ज करणा-या विद्यार्थ्यांना प्रवेश अर्जासोबत अनुसूचित जमातींना जातीची प्रमाणपत्रे देण्यासाठी सक्षम असलेल्या अधिका-यांचे जातीचे प्रमाणपत्र तसेच तपासणी समितीने दिलेले प्रमाणपत्र प्रवेश अर्जासोबत सादर करावे लागेल."

त्याऐवजी "अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय व अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाकरिता राखीव जागा असतात त्या जागांकरिता अर्ज करणा-या विद्यार्थ्यांनी प्रवेशाकरिता प्रवेश फॉर्म सादर करताना जातीचा दाखला जोडावा. मात्र प्रवेशाच्या वेळी अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीकडील वैधता प्रमाणपत्र ( Certificate of Validity ) सादर करावे, त्यानंतरच राखीव जागेवर प्रवेश दिला जाईल." असे वाचण्यात यावे.

2. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग आणि उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांनी त्यांच्या अभ्यासक्रमाच्या प्रवेशपत्रात वरील प्रमाणे दुरुस्ती करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(स.नु.गावीत)
शासनाचे अवर सचिव.

प्रति,
राज्यपाल यांचे सचिव,